# Maharashtra Board Class 10 Sanskrit Anand Solutions Chapter 8 नदीसूक्तम्

भाषाभ्यास:

1. माध्यमभाषया उत्तरत ।

प्रश्न अ.
विश्वामित्र: नद्यौ किं प्रार्थयते ?
उत्तरम् :
विश्वामित्र – नदी संवाद, हे संवादसूक्त ऋग्वेदाच्या तिसऱ्या मंडलात आढळते. यामध्ये, विश्वामित्र ऋषी नदीला मातेसमान मानून तिची पूजा करतात आणि तिला जपण्याचे व तिची सेवा करण्याचे वचन देतात.

विश्वामित्र ऋषी बियास व सतलज नद्यांच्या संगमाजवळ पोहोचले. तेव्हा त्यांनी नद्यांना आदरयुक्त शुभेच्छा दिल्या. त्यांनी नद्यांना 'माता' असे संबोधून त्यांना उथळ होण्याची विनंती केली. याचप्रमाणे विश्वामित्रांनी नद्यांना त्यांचे प्रवाह कमी करण्यासाठी प्रार्थना केली.

प्रश्न आ.
मानवानां जीवनं नदीनां साहाय्येन कथं समृद्धं जातम् ?
उत्तरम् :
विश्वामित्र – नदी संवाद, हे संवादसूक्त ऋग्वेदाच्या तिसऱ्या मंडलात आढळते. यामध्ये, विश्वामित्र ऋषी नदीला मातेसमान मानून तिची पूजा करतात आणि तिला जपण्याचे व तिची सेवा करण्याचे वचन देतात.

संपूर्ण पृथ्वीवर नदीजल हा पाण्याचा उपयुक्त स्रोत आहे. पुष्कळ वर्षांपासून नद्या या शेतीमध्ये शेतकऱ्यांना उपयुक्त ठरतात. केवल शेतांचीच नव्हे तर संपूर्ण पृथ्वीची पाण्यामुळे भरभराट झाली. पाण्याचा योग्य प्रकारे संचय करुन वीजनिर्मितीकरता जनित्र (जनरेटर) सुद्धा लावले गेले व मानवाचे जीवन पाण्यामुळे प्रकाशमान झाले. या प्रकारे नद्यांच्या साहाय्याने मानवी जीवन समृद्ध झाले.